| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा १११/२०२३**<br>**सखुबाई मधुकर गवळी**<br>**वि.**<br>**जयश्री तुकाराम दाभोळकर वगैरे** |

## नि. २७ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १, ५१ व ५२ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जास वादी याने नि. ३३ येथे त्यांचे म्हणणे सादर करून अर्जास सक्त विरोध दर्शविला आहे.

३. प्रतिवादी क्र. १, ५१ व ५२ तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, मुळातच वादी याने प्रस्तुत दावा हुकुमनामा रद्दबादल करणेकरिता तसेच प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ५१, ५२ यांचे बरोबर केलेले खरेदीपत्र रद्दबादल होवून मिळणेकरिता तसेच कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. दाव्याचा संपूर्ण तपशील पाहता वादी याने सदर दिवाणी मुकदमा क्र. १४/१९९८ चे निकाल पत्र तसेच हुकूमनामा दि. २५.०४.२००० रोजी च्या बाबतची त्यांना नेमकी माहिती केव्हा प्राप्त झाली याबाबत अर्जात तसेच दाव्यात कोणताही तपशील नमूद केलेला नाही. केवळ नियमित दिवाणी दावा क्र. १४/१९९८ चा हुकुमनामा हा प्रतिवादींनी बेकायदेशीररित्या मिळवलेला आहे असे मोघम कथन वादीने केलेले आहे. सदरचा हुकूमनामा कोणत्या कायद्याच्या तरतुदींविरुद्ध आहे व तो लबाडीने कसा घेतला याबाबत कोणताही तपशील नमूद नाही. मुळातच वादी हिने प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ५१, ५२ यांनी गट क्र. ४०४ ची मिळकत विक्री केली हे मान्य करून सदरची जमीन राष्ट्रीय महामार्गामध्ये संपादित झाल्यामुळे त्याचा मोबदला प्रतिवादी क्र. ५१ व ५२ यांना मिळू नये अशी चुकीची कायद्याविरुद्धची मागणी केलेली आहे. पण सदर मोबदला हा मुळातच भूसंपादन खात्याकडे मिळणारा आहे व त्यांना या कामी पक्षकार

करण्यात आलेले नाहीत. वास्तविकरित्या वादीच्या हिश्याचे पूर्व हक्कदार वडील दत्तू यांना ज्ञानदेव, तुकाराम व नामदेव हे भाऊ व सुशिला व कमलाबाई या बहिणी असे राउ संभाजी चिले यांना वारस होते. ज्ञानदेव ची मुलगी व पत्नी यांना दत्तू, तुकाराम, नामदेव, सुशिला व कमलाबाई यांचे पूर्व हक्कदार वडील राउ यांच्याकडून आलेल्या वाडवडिलार्जित मिळकतीमधील ज्ञानदेव शाखेचे तुटक हिस्सा करून मिळण्याची दाद मागितली होती. कायद्यानुसार दत्तूच्या शाखेतील त्यांची मुले भाउ, सदाशिव, पांडुरंग, बाजीराव यांना प्रतिवादी करण्यात आलेले होते. कायद्यानुसार प्रत्येक शाखेतील प्रमुखाला प्रतिवादी केले तरी पुरेसे असते तसेच दत्तूच्या शाखेतील वारसांच्या बाबत ज्ञानदेव च्या बायको व मुलीने वाटणी मागितली नव्हती. त्यामुळे दत्तूचे सर्व वारस म्हणजे त्या शाखेचे सर्व हक्कदार यांना पक्षकार करण्याची कायद्याने आवश्यकता नसते. अशी परिस्थिती असताना वादीने तिच्या वडिलांच्या हिश्यातील हिस्सा सरस निरस मानाने वाटप होण्याची दाद न मागता प्रतिवादी क्र. १ यांने ज्ञानदेवच्या शाखेतील मुली व पत्नीने केलेल्या दाव्याचा हुकुमनामा रद्दबादल करून मागितला आहे ही बाब कायद्याला अभिप्रेत नाही. सदर हुकूमनामा दि. २५.०४.२००० रोजी पारीत झालेला असून त्याप्रमाणे रितसर वाटप तक्ता होवून महसूल खात्याने वाटप तक्ता तयार करून त्याचे वाटप करून त्याचा कब्जा स्वतंत्रपणे प्रतिवादी क्र. १ यांना दिलेला आहे. वादीने सदरच्या वाटणीच्या दाव्यामध्ये वादीच्या भावाने वाटणीत कोणताही आक्षेप घेतला नव्हता. त्यामुळे २० वर्षापूर्वी झालेला हुकूमनामा कोणत्याही सबळ कारणाशिवाय रद्द करून मागण्याचा वादीला कोणताही अधिकार नाही.

४. प्रतिवादी तर्फे वकील यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, वादी हिने मागितलेली दाद ही विशिष्ट दिलासा अधिनियम १९६३ चे कलम ४१ एच व डी नुसार वादीने परत वाटपाचा दावा करणे व वाटप परत करण्यासाठी दाखल करता आला असता, परंतु प्रतिवादी क्र. १ चा दावा हा वादीच्या वडिलांच्या वारसांच्या मधील वाद नाही. त्यामुळे वादीस वाटणीचा दावा करण्याची स्वतंत्रपणे मुभा असताना देखील केवळ वादीने चुकीच्या पद्धतीने नियमित दिवाणी दावा क्र. १४/१९९८ मधील हुकूमनामा रद्द करून मागितलेला

आहे. त्यामुळे वादीच्या दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. प्रतिवादी क्र. १ ने कायद्यानुसार मिळालेला हिस्सा हा प्रतिवादी क्र. ५१ व ५२ यांना तबदील केला आहे तो व्यवहार रद्दबादल करून मागण्याचा वादीला हक्क व अधिकार नाही. त्यामुळे शासनाने संपादित केलेल्या मोबदल्याबाबत हरकत करण्याचा वादीस हक्क व अधिकार नाही. मुळातच वादीचा दावा हा कोणत्याही कारणाशिवाय दाखल करण्यात आलेला आहे. दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. त्यामुळे वादी हिचा दावा फेटाळण्यास पात्र आहे. अंतिमतः प्रतिवादी क्र. १, ५१ व ५२ तर्फे वकील यांनी सदर दावा खर्चासह फेटाळून लावणेत यावा अशी विनंती केली.

५. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, मुळातच प्रतिवादी यांनी दाखल केलेला अर्ज हा खोटा, चुकीचा व बेकायदेशीर आहे. प्रतिवादी यांच्या अर्जामधील मजकूर व कायदेशीर तरतुद या दोन वेगवेगळया गोष्टी आहेत. त्यामुळे प्रतिवादीने दाखल केलेला अर्ज हा चुकीच्या तरतुदींनुसार दाखल केलेला असून तो चालण्यास पात्र नाही. मुळातच वादी यांनी दावा मिळकतीबाबत योग्य तो खुलासा दाखल केलेला आहे. दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. ४८ व ४९ हे कायदेशीर व सरळ वारस असून त्यांचे अपरोक्ष अपुरे वारस दाखवून व त्यांना पक्षकार न करता झालेला न्यायनिर्णय हा खोटा, चुकीचा व लबाडीचा असून तो रद्दबादल स्वरुपाचा आहे. त्यामुळे त्याबाबत हक्कज्ञापन होवून मिळणे गरजेचे आहे. मुळातच प्रतिवादी यांनी केलेले खरेदीपत्र हे खोटे, चुकीचे व लबाडीचे आहे. तसेच प्रतिवादी क्र. ५० ते ५२ यांनी सदर मिळकतीबाबत दाव्याविषयी हुकूमनामा रद्दबादल होणे याकरिता कायम मनाई ताकीद मिळणे गरजेचे आहे. मुळातच वादीच्या दाव्यास कारण घडलेले आहे. उप जिल्हाधिकारी भुसंपादन यांनी दि. ०८.०६.२०२३ रोजी त्यांचे म्हणणे सादर केले. त्याची प्रत वादी यांना मिळाल्यानंतर वादी यांनी ती प्रत त्यांच्या वकिलांना दाखविली. त्यावेळी वादी यांनी प्रथमतः नियमित दिवाणी दावा क्र. १४/१९९८ हा वाटपाचा दावा दाखल करण्यात आला होता व त्याबाबत हुकूमनामा झालेला आहे व त्या नंतर प्रतिवादी क्र. ५१ व ५२ यांनी खरेदीपत्र केलेले आहे याबाबतची माहिती समजली.

त्यानंतर सदर दाव्याचा निकाल कोल्हापूर येथील न्यायालयात मिळाल्यानंतर सदर हुकूमनाम्याद्वारे व खरेदीपत्राद्वारे प्रतिवादी क्र. १ व ५० ते ५२ यांची नावे लावलेली आहेत हे वादीच्या लक्षात आले. त्यामुळे एकंदरितच वादी यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले त्यामुळे वादी यांच्या दाव्यास तेवढे कारण घडलेले आहे. मुळातच वादी यांची सदर वाडवडिलार्जित मिळकत आहे. वादी यांनी दाव्यात नमूद केल्याप्रमाणे वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. त्यामुळे हिंदू वारसा कायद्यानुसार वारसा हक्क हा वादी यांना मिळालेला आहे. तसेच सदर मिळकतबाबतचे सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. तसेच सदर मिळकत ही हिंदू एकत्र कुटुंब कायद्यामधील मिळकत आहे. त्यामुळे त्याबाबत गुणदोषावर पुरावा होवून अंतिम न्यायदान होणे गरजेचे आहे. तसेच वादी या अशिक्षित अडाणी असल्यामुळे सदर मिळकतीच्या सातबारापत्रकी कोणाचे नाव लावले हे त्यांना समजून आले नाही. तसेच वादी यांनी स्वतःचे हक्क व अधिकाराकरिता सदर दावा दाखल केलेला आहे व फसवणूक झाल्याबाबत स्वतंत्र अधिकार अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. मुळातच वादीच्या दाव्यास कोणत्याही कायद्याची बाधा येत नाही. वादीच्या दाव्यास स्पष्टपणे कारण घडलेले आहे. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या अर्ज खोटा व लबाडीचा आहे. त्यामुळे एकंदरितच प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच प्रतिवादी यांना रक्कम रु. ५०००/– कॉस्टस आकारणे गरजेचे आहे. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

६. प्रतिवादी क्र. १, ५१ व ५२ यांचा अर्ज, वादी यांचे म्हणणे, प्रतिवादी क्र. १, ५१ ५२ तर्फे सन्माननीय वकील श्री. व्ही. बी. माने व वादी तर्फे वकील श्री. व्ही. एस. माणगावे यांचा सखोल युक्तीवाद ऐकला असता माझ्या विचारार्थ पुढील मुद्दे निर्माण होत असून त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह मी पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अनु क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | ११ प्रमाणे खारीज होणेस पात्र आहे काय ? | |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

७. **मुद्दा क्र. १ करिता :–**

मुळातच प्रस्तुत ठिकाणी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ याचे अवलोकन करणे गरजेचे ठरते. दिवणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ पुढील प्रमाणे :–

*(अ) जेव्हा त्यातून काही वादकारण दिसून येत नसेल*

*(ब) जो अनुतोष मागितला असेल त्याचे मूल्य कमी दाखविले गेले असेल व न्यायालय निश्चित करील अशा मुदतीच्या आता न्यायालयाने त्याला मूल्यांकनात सुधारणा करण्यास सांगितले असता वादीने तसे करण्यात कसूर केली असेल.*

*(क) मागितलेल्या अनुतोषाचे योग्य मुल्यांकून करण्यात आले असले, तरी वादपत्र अपुऱ्या मूल्याचा मुद्रांक लावलेल्या कागदावर लिहिलेले असेल आणि न्यायालयनिश्चित करील अशा मुदीत न्यायालयाने त्याला आवश्यक तो मुद्रांकित कागद सादर करण्यास सांगितले असता, वादीने तसे करण्यात कसूर केली असेल.*

*(ड) वादपत्रात केलेल्या निवेदनावरुन दाव्याला एखाद्या कायद्यानुसार रोध आहे असे दिसत असेल.*

*(ई) ते दोन प्रतींत सादर केलेले नसेल.*

*(फ) वादीने नियम ९ च्या तरतुदींचे पालन केले नसेल.*

८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार अर्जाबाबत निर्णय घेताना वादी यांनी दाखल केलेला दावा व त्यासोबतची कागदपत्रे यांचे अवलोकन करणे अत्यंत गरजेचे ठरते.

९. प्रस्तुत कामी वादी हिने दाखल केलेला दावा हा हुकूमनामा रद्दबादल करणेकरिता,

हक्कज्ञापनाकरिता तसेच खरेदीपत्र रद्दबादल करणेकरिता व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. मुळातच वादी हिने वडिलोपार्जित मालमत्तेसंदर्भात झालेले वाटप हे रद्द करून मागितले आहे.

१०. मुळातच वादीच्या कथनानुसार दावा मिळकती या वडिलोपार्जित मिळकती आहेत. तसेच वादी हिने दाव्यामध्ये वंशावळ दाखल केलेली आहे. सदर वंशावळीनुसार तिला सदर मिळकतीबाबत मुलगी या नात्याने कायद्यानुसार हक्क व अधिकार आहे.

११. मुळातच दाखल कागदपत्रांनुसार नियमित दिवाणी दावा क्र. १४/१९९८ मध्ये वादी ही पक्षकार दिसून येत नाही. तसेच सदर कामी वाटप हे एका शाखेकडून मागण्यात आलेले दिसून येत आहे. तसेच वादी हिचे भाऊ हे या कामी पक्षकार दिसून येत आहेत. परंतु ज्या कामात वादी पक्षकार नाहीत त्याबाबत झालेले वाटप हे वडिलोपार्जित मालमत्ता असल्यामुळे वादी हिचेवर बंधनकारक होणार नाही असे सकृतदर्शनी वाटते.

१२. तसेच कायद्यातील मुदतीचा प्रश्न हा कायदा व वस्तुस्थिती असा दोन्ही अंर्तभूत असणारा प्रश्न आहे. त्यामुळे सदर मुदतीबाबत सुनावणी घेतल्याखेरीज त्याबाबत कोणताही निर्णय करणे योग्य होणार नाही असे वाटते.

१३. तसेच वादी ही नियमित दिवाणी मुकदमा क्र. १४/१९९८ या कामी झालेला हुकूमनामा रद्द करून मागत आहे. त्यामुळे जर वादी त्या प्रकरणात पक्षकार नाही तर त्याबाबत वादी हिला वाटप मागण्याचा अधिकार आहे असे सकृतदर्शनी वाटते. तसेच वादीच्या कथनानुसार दावा मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत आहे. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी दिलेल्या विविध न्यायनिर्णयांनुसार वडिलोपार्जित मिळकतीमध्ये वाटप मागण्याचा मुलीला पुर्णपणे अधिकार आहे. तसेच वादी ही संपूर्ण वडिलोपार्जित कुटुंब शाखेतील वंशावळीनुसार मुलगी दिसून येत आहे. त्यामुळे

त्याबाबत वाटप मागण्याचा वादी हिला कायद्यानुसार पुर्णपणे अधिकार आहे असे वाटते.

१४. त्यामुळे एकंदरित सर्व कारणमिमांसेचा विचार करता प्रतिवादी क्र. १, ५१ व ५२ यांनी दाखल केलेला अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**प्रतिवादी क्र. १, ५१ व ५२ यांचा नि. २७ वरील अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येत आहे.**

**सही/–**
**के. दि. काकतकर**
सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा

पन्हाळा
दि. ३०.१०.२०२५